ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सातारा जिल्हयातील होमगार्ड संघटना व कार्य ( १९४८ - १९७० )

प्रा.डॉ.अजितकुमार दादासो जाधव
इतिहास विभाग, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे , ता.जि.सातारा .
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत.

**गोषवारा (Abstract)**

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी भुमिकेने हिंदुस्तानात जातीय व धर्मीय तेढ मोठ्या प्रमाणात वाढली. सर्व सामान्य जनतेचे जीवन धोक्यात आले. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला यासाठी प्रशासकीय सेवा व पोलीसांना जनतेचा सहभाग व स्वयंसेवकांची मदत मिळावी या उद्देशाने ६ डिसेंबर १९४६ रोजी मुंबई येथे नगरसेना (होमगार्ड) या नावाची शिस्तप्रिय संघटनेची स्थापना झाली. या संघटनेने राज्यभरात विशेषत: सातारा जिल्हयात शांतता, सुप्रशासन, सामाजिक सेवा, नैसर्गिक आपत्ती इ. परिस्थितीत मोलाची मदत केली. तसेच अनेक नेतृत्वाने या होमगार्ड संघटनेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. या सर्व घटकाची सदर शोधनिबंधामध्ये चर्चा केलेली आहे.



## होमगार्ड संघटनेचा पुर्वेतिहास :-

भारतामध्ये आधुनिक काळात ब्रिटिशांनी सर्वत्र आपले साम्राज्य निर्माण केले. भारतामध्ये आपली राजवट स्थिर व्हावी म्हणून ब्रिटीशांनी धर्म आणि जातीयता याचा आधार घेतला. येथील समाजात दुही (फुट) माजवली. अनेक ठिकाणी धार्मिक आणि जातीय दंगली सुरू झाल्या. सन १९४६ च्या डिसेंबर महिन्यात मुंबई राज्यात जातीय दंगलीने थैमान घातले होते. या जातीय दंगली थांबविण्यासाठी, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारची पोलिस यंत्रणाही अपुरी पडू लागली. लोकांनी द्वेषापोटी खून, लुटालुट, जाळपोळ ईत्यादी विध्वंसक कृत्य केल्यामुळे मुंबई शहरातील व्यापार, व्यवहार थांबले. तसेच सर्वसामान्य जनतेचे जीवन धोक्यात आले. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. पोलिस दलावरही ताण आला होता. अशा परिस्थितीत पोलिसाच्या मदतीला लष्कराची मदत घेण्यात आली व जातीय दंगल शमविण्यात आली. वरील परिस्थितीचा विचार करून अशांत परिस्थितीत प्रशासकीय किंवा पोलिसी प्रयत्नांना जनतेचा सहभाग आणि स्वयंसेवी स्वरूपात मदत मिळावी या उद्देशाने मुंबई राज्याचे ( Mumbai Province) तत्कालीन गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी ६ डिसेंबर १९४६ रोजी प्रथमच 'नगरसेना' (होमगार्ड) या नावाची एक शिस्तप्रिय स्वयंसेवकाच्या संघटनेची स्थापना केली. प्रारंभी ती मुंबईत व नंतर अहमदाबाद येथे स्थापना केली.[१] मुंबई येथे नगरसेना (गृहरक्षक दल) याची स्थापना झाल्यानंतर त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री गोविंदवल्लभ पंत यांनी मुंबई येथील गृहरक्षक दलाला भेट दिली. या भेटीत गृहरक्षक दलाच्या कवायतीचे निरिक्षण केले. त्याचे स्वरूप व कार्य समजून घेतले. ही योजना नाविन्यपूर्ण व देशहिताची वाटल्याने त्यांनी मुंबईच्या धर्तीवर स्वयंसेवी व शिस्तबध्द अशा गृहरक्षक दलाची ( Home Guard) स्थापना अन्य राज्यामध्ये ही करावी अशा सुचना करून तीची अंमलबजावणी करण्यात आली. गृहसंरक्षणाच्या नावाखाली 'न्यू सिव्हिल डिफेन्स ॲक्ट १९६८' या कायद्यानुसार पश्चिम बंगाल, राजस्थान, मध्यप्रदेश, तामिळनाडू, गुजरात इत्यादी राज्यामध्ये गृहरक्षक दलाची (होमगार्ड) स्थापना करण्यात आली. सन २०१२ पर्यंत केरळ वगळता २५ राज्ये व केंद्रशासीत प्रदेशात ही गृहरक्षक संघटना कार्यरत झाल्याचे दिसते.[२] पुढे राज्यांच्या प्रत्येक जिल्हयात अशा गृहरक्षक दलाची स्थापना करून ती कार्यरत करण्यात आली.

महाराष्ट्रात या गृहरक्षक दलाचा प्रारंभ झाला असल्याने राज्यभरात अशी गृहरक्षक दले स्थापन करून त्यांची पदे व जबाबदाऱ्या ठरविण्यात आल्या. राज्याचा प्रमुख म्हणून गृहरक्षक "महासमादेशक" हे पद निर्माण करण्यात आले तर जिल्हयाच्या ठिकाणी "जिल्हा समादेशक" हे पद निर्माण करून त्यांचे कार्य व जबाबदाऱ्या ठरविण्यात आल्या. जिल्हयामध्ये गृहरक्षक दलाचे कामकाज सुनियोजित चालावे म्हणून जिल्हास्तरीय सल्लागार समितीची स्थापना केली. या समितीत जिल्हयाचे जिल्हाअधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक गृहरक्षक दलाचे जिल्हा समादेश तसेच राज्य सरकार नियुक्त ३ ते ५ अशासकीय व्यक्ती सदस्य म्हणून घेण्यात आल्या. जिल्हा सल्लागार समितीचे सचिव म्हणून गृहरक्षक दलाचे 'जिल्हा समादेशक' काम पाहत असतात.[३]

## सातारा जिल्हयात गृहरक्षक दलाची स्थापना :-

गृहरक्षक दलानी ( होमगार्डस) जातीयता निर्मुलन, गुन्हेगारी इतकेच मर्यादीत न राहता या दलाच्या माध्यमातून देशासाठी आदर्श नागरीक घडावेत. यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी सातारा जिल्हयात ३ एप्रिल १९४८ रोजी गृहरक्षक दलाची स्थापना केली. यावेळी तरूणांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन देशासाठी सामाजिक सेवेचे व्रत अंगिकारावे असे आव्हान केले. त्या काळात अनेक तरूणांनी भारावून जाऊन या गृहरक्षक दलात सहभाग घेतला. सन १९४८ ते १९७० या कालखंडात सातारा जिल्हयाच्या गृहरक्षक दलाचे 'जिल्हा समादेशक' म्हणून अनेक लोकांनी अतिशय कार्यक्षमपणे कार्य करून गृहरक्षक दलाचे काम खेडयापाडयात पोहचविले.[४]

## जिल्हा समादेशक व त्यांचे कार्य:-

सातारा जिल्यात गृहरक्षकदलाने अतिशय प्रभावी पणे काम केल्यामुळे महाराष्ट्रात सातारा जिल्हयाचा वेगळा ठसा उमटला होता. सातारा जिल्हयातील गृहरक्षक दलाचा (Home Guard) विस्तार व्हावा. यासाठी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या व्यक्ती निवडाव्यात हे उद्दीष्ट समोर ठेवून सामाजिक व शासकीय स्तरावर चर्चा होऊन वसंतदादा पाटील यांच्याकडे 'जिल्हा समादेशक' म्हणून गृहरक्षक दलाची सुत्रे दिली. याअगोदर बाबूराव सखाराम नलावडे यांनी जिल्हा समादेशक म्हणून १९४७ ते १९४८ या कालखंडात काम पाहिले होते. वसंतदादानी १९४८ या कालखंडात काम पाहिले होते. त्यांनी आपल्याकडे पदभार आल्यानंतर रचनात्मक बदलास प्रारंभ केला. गृहरक्षक दलाचे समाजात महत्व पटवून दिले. जिल्यातील अनेक गुन्हे उघडकीस आणून गुन्हेगारांचा शोध घेऊन पोलिसांच्या ताब्यात दिले. गृहरक्षक दलात महिलांचा समावेश केला. थोडक्यात १९४८ ते १९५० या कालखंडात जिल्हा समादेशक गृहरक्षक दलाला प्रतिष्ठा मिळवून दिली. पुढे १९५० साली गृहरक्षक दलाच्या कामकाजाच्या सोईसाठी उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन विभाग पडले. दक्षिण साताराचे जिल्हा समादेशक म्हणून वसंतदादा पाटील तर उत्तर साताराचे जिल्हा समादेशक म्हणून बाळासाहेब देसाई यांची नियुक्ती सरकारने केली. बाळासाहेब देसाई यांनी जिल्हा समादेशक म्हणून दारूबंदी कार्य केले. याच सुमारास बाळासाहेब देसाईना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे काम दिल्याने त्यांना समादेशक पदावरून मुक्त करण्यात आले. त्यांच्या जागी जिल्हा समादेशक म्हणून दादासाहेब राजाज्ञे यांची नियुक्ती झाली. त्यांनी बुध्दीवादी, सामाजिक कार्यकर्ते यांना गृहरक्षकदलात सामील करून घेण्यासाठी प्रबोधन केले. तसेच होमगार्डसना मोटार ड्रायव्हींगचे प्रशिक्षण दिले. दादासाहेब राजाज्ञे यांच्यानंतर तात्पुरत्या जिल्हा समादेशक पदाची धुरा साताऱ्यातील प्रसिध्द व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते जी. आर. मणियार यांच्याकडे सोपविण्यात आली. सन १९४८ पासून १९५९ पर्यंत सातारा जिल्हा समादेशक म्हणून रावसाहेब बी. एन. नलवडे, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, दादासाहेब राजाज्ञे, जी. आर. मणियार यांनी काम पाहिले यांच्या कारकिर्दीत सातारा जिल्हयात गृहरक्षक दलाची स्थापना होऊन जनतेचे सामाजिक प्रश्न सोडविणे तसेच गृहरक्षक दलाबाबत सामान्यांच्या मनात विश्वास निर्माण केला. होमगार्ड संघटनेच्या माध्यमातून शिस्तबध्दरीतीने युवकांना आकर्षित करून सामाजिक प्रश्नाची सोडवणूक व्हावी. यासाठी कुशल संघटकाकडे गृहरक्षक दलाची सुत्रे देण्याचे निश्चित झाले यातूनच जिल्हा समादेशक म्हणून दि. १ डिसेंबर १९५९ रोजी माधवराव जाधव यांची निवड करण्यात आली.[५]

## जिल्हा समादेशक म्हणून माधवराव जाधव यांचे कार्य :-

माधवराव जाधव यांनी स्वातंत्र्यपुर्व काळात १९४२ च्या चलेजाव आंदोलन सातारा जिल्हयात सक्रीय क्रांतीकारक म्हणून कार्य केले होते. गृहरक्षक दलाच्या स्थापनेपासूनच त्यांचा या संघटनेशी संबंध आल्याचे दिसून येते. सातारा जिल्हा गृहरक्षक दलाच्या संपूर्ण जिल्हयात तालुकानिहाय शाखा उघडण्यात आल्या होत्या. त्यापैकी कराड तालुक्याचे ऑफिसर कमांडिंग व स्टाफ ऑफीसर प्रोहिविशन म्हणून अतिशय प्रामाणिकपणे कार्य माधवराव जाधव यांनी केले. त्यांच्या कराड तालुक्यातील या कार्याची नोंद जिल्हा गृहरक्षकदलाने घेऊन त्यांची सातारा जिल्हा समादेशक म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांनी जिल्हासमादेशक पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर जिल्हयात प्रत्येक ठिकाणी जाऊन प्रत्येक होमगार्डच्या भेटी घेतल्या. त्यांच्या अडीअडचणी, प्रश्न समजावून घेतले. अनेक धाडसी निर्णय घेऊन होमगार्डना सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या. गृहरक्षक दलामध्ये नवचैतन्य निर्माण करून संघटनेमधील कामकाजाची जबाबदारी विश्वासाने अनेक लोकांवर सोपविली. जिल्हयातील युवकांच्या मध्ये गृहरक्षक दलाबाबत आकर्षण निर्माण केले. थोडक्यात माधवराव जाधव यांनी जिल्हाप्रमुख म्हणून गृहरक्षक दलाचे कार्य सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहचविण्याचे काम केले. माधवराव जाधव यांनी जिल्हासमादेशक झाल्यानंतर प्रथमच दक्षिण महाराष्ट्रात 'सातारा जिल्हा कबड्डी असोसिएशन' व 'सातारा जिल्हा खो-खो असोसिएशनची' स्थापना करून जिल्हयातील तरूणांना आकर्षित करून होमगार्डच्या कार्यात सामील करून घेतले. जिल्हयातील तरूणांना क्रीडा स्पर्धाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर क्रीडा स्पर्धेचे कवाडे खुली केली. माधवरावांच्या या कार्यामुळे सातारा जिल्हयातील अनेक तरुणांनी गृहरक्षक दलाच्या कार्यात उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.[६]

## राष्ट्रविकास व समाजहिताचे कार्य :-

माधवराव जाधव यांनी जिल्हा समादेशक म्हणून कार्य करीत असताना होमगार्ड संघटनेला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले. होमगार्ड हा फक्त पोलिस किंवा सरकारला मदत करणारा राहिला नाही तर होमगार्ड हा समाजातील लोकांच्या सुख दुःखाशी समरस झाला पाहिजे यासाठी प्रयत्न केले. होमगार्ड सरकार व समाजातील दुवा म्हणून कार्य करण्यास प्रवृत्त केले. होमगार्ड (गृहरक्षक दल) चे कार्य करीत असताना त्यातील अडीअडचणी, प्रश्न, सुचना वारंवार महाराष्ट्र होमगार्डकडे मांडले. परिणामतः सरकारने यामध्ये लक्ष घालून महाराष्ट्र राज्य होमगार्ड मध्ये अनेक बदल केले. तसेच मा. नामदार यशवंतराव चव्हाण व महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र गृहरक्षक दलाचे मुल्यमापन करण्यासाठी सन १९६१ साली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीत भारताचे माजी सरसेनानी जनरल करिअप्पा यांना अध्यक्ष तर के. एल. पंजाबी व मा. देशमुख यांना सदस्य म्हणून नेमण्यात आले. या समितीने महाराष्ट्रातील विविध जिल्हयात दौरा करून गृहरक्षक दल (होमगार्ड) ची पाहणी करून काही निरिक्षणे नोंदविली. १ डिसेंबर १९६१ रोजी जनरल

करिअप्पा समितीने सातारा जिल्हा गृहरक्षक दलास भेट दिली. त्यावेळी जिल्हा समादेशक म्हणून माधवराव जाधव यांनी या समितीबरोबर जिल्हयातील विचारवंत, नेतेमंडळी यांची चर्चा घडवून आणली. या चर्चेतील अनेक मुद्दे पुढे समितीने आपल्या अहवालात लिहिल्याचे दिसून येते. पुढे करीअप्पा समिती चा अहवाल प्रसिध्द झाल्यावर माधवराव जाधव यांनी सन १९६२ मध्ये कराड येथे सर्व होमगार्डसना एकत्र करून करिअप्पा समितीच्या अहवालाची मिमांसा करण्यासाठी एक चर्चासत्र आयोजित केले. याच चर्चासत्रात जिल्हयातील होमगार्ड संघटनेच्या कार्याची पुढील दिशा ठरविण्यात आली. यामध्ये पोलिसांना कारण नसताना मदत करणे ताज्य ठरविण्यात आले. होमगार्डसना कायदयाची माहिती मिळावी. राष्ट्रीय ऐक्य, सामाजिक आचार, विचार, शरीर संवर्धन सैनिकी शिस्त, सेवावृत्ती या घटकांना होमगार्डनी प्राधान्याने महत्त्व दयावे यासाठी त्यांना विविध प्रकारच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला, संकटग्रस्तांना मदत करणे, प्रथमोपचार, आग विझविणे, संपकाळात कामगारांचे अधिकार अबाधित ठेवून जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी दळणवळण, पाणीपुरवठा, विदयुतपुरवठा चालू ठेवण्याचे प्रशिक्षण दिले. अशा प्रशिक्षण शिबीरामध्ये प्रशिक्षण घेतलेल्या होमगार्डसना जिल्हयात व राज्यात विविध आपत्तीच्या वेळी महत्त्वपूर्ण मदत केल्याचे दिसून येते.[७]

महाराष्ट्र राज्य गृहरक्षक दलाच्या कार्यामुळे सरकार व सर्व सामान्य लोकांना नागरी संरक्षणाचे महत्त्व पटू लागले. सातारा जिल्हयात होमगार्डस अधिकाधिक कार्यक्षम व्हावेत. त्यांच्या प्रत्येक कार्याची दखल घेतली जावी यासाठी माधवराव जाधव यांनी महिन्यातून एकदा जिल्यातील सर्व होमगार्ड ऑफिसर आणि एन.सी.ओ. यांची कॉन्फरन्स आयोजित करणे सुरू केले. या कॉन्फरन्समधून चेन ऑफ कमांड, शिस्तबध्दता, होमगार्ड मॅन्युअल, नागरी संरक्षण, पार्टटाईम योजना या विषयाची चर्चा करण्यात येत असे. अशा कॉन्फरन्स मुळे होमगार्ड संघटनेत नवचैतन्य आल्याचे दिसून येते. युध्दप्रयोग, आणीबाणी इत्यादी संकट काळात नागरिकांना मदत मिळावी म्हणून 'प्रशिक्षित नागरिक' (ऑक्झिलरी होमगार्ड) ही संकल्पना रूजविली. अशा ऑक्झिलरी होमगार्डना प्रशिक्षित करण्याचे काम माधवराव जाधव याच्या नेतृत्वासाठी होमगार्डने केले. याशिवाय मोठमोठ्या कारखान्याना अंतर्गत संरक्षण मिळावे. यासाठी कारखान्यानी स्वखर्चाने औदयोगिक होमगार्डची पथके उभी करावीत असा आदेश सरकारकडून आला होता. रेठरे बु || येथील कृष्णा सहकारी साखर कारखाना व ओगलेवाडीतील ओगले ग्लास वर्क्स या ठिकाणी अशी पथके नेमण्यात आली. या पथकांना सातारा जिल्हा गृहरक्षक दलातर्फे प्रशिक्षण देण्यात आले. सातारा जिल्यातील गृहरक्षक दलाच्या भरीव व उपक्रमशील कार्यामुळे अनेक राजकीय संघटना, युवक मंडळे, स्वयंसेवक विविध संस्था होमगार्ड चळवळीकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते. १० डिसेंबर १९६९ रोजी सातारा जिल्यातील कोयना धरण परीसराला भुकंपाचा तीव्र धक्का बसला या भुकंपामुळे प्रचंड वित्त हानी होऊन काही लोकांचा मृत्यूही झाला. अनेक लोक बेघर झाले. अशा नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी माधवराव जाधव कराड शहरातील सर्व होमगार्डसना घेऊन कोयना परीसरात सर्वप्रथम हजर झाले. अहोरात्र या होमगार्डसनी लोकांना मदत केली. आपल्या प्राणाची पर्वा न करता लोकांना संकटातून बाहेर काढले.[८]

## समारोप :-

एकंदरीत सातारा जिल्हयाच्या क्रांतीकारी भूमीत स्वातंत्र्यानंतर सर्वसामान्य जनता, महाराष्ट्र सरकार व नागरी संरक्षण यामध्ये दुवा म्हणून सातारा जिल्हा गृहरक्षक दलाने कामगिरी केली. सन १९४८ ते १९७० या कालखंडात समाजहिताच्या अनेक कार्यामध्ये सक्रीय सहभाग गृहरक्षक दलाने नोंदविला. दारूबंदी, साक्षरता प्रसार, शेती संवर्धन, कुटुंब नियोजन, भुकंपग्रस्ताना मदत, दुष्काळ निवारण अशा अनेक मोहिमात महत्वपूर्ण कार्य केले. सन १९४८ ते १९५९ पर्यंत रावसाहेब बी. एन. नलावडे, वसंदादा पाटील, बाळासाहेब देसाई, दादासाहेब राजाज्ञे, जी. आर. मणियार यांनी सातारा जिल्हा समादेशक म्हणून सामाजिक प्रश्नाची सोडवणूक करीत गृहरक्षक दलाची संघटना मजबूत स्थितीत उभी केली व यानंतर १९५९ ते १९७० या कालावधीत माधवराव जाधव यांनी सातारा जिल्हा गृहरक्षक दलाचे समादेशक म्हणून महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सातारा जिल्हा गृहरक्षकदलाचे कार्य महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर पोहचविण्याचे काम केले. हजारो तरूण कार्यकर्त्यांची संघटनात्मक बांधणी करून त्या सर्वांना होमगार्डसच्या माध्यमातून देशसेवा व समाजसेवेचे व्रत, संस्कार दिला. स्वतः माधवरावांनी आयुष्यभर गृहरक्षक दलाची भरभराट व्हावी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

## संदर्भ

१) मराठी विश्वकोश, खंड २०, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई.
२) मराठी विश्वकोश, खंड२०, उपरोक्त,
३) कित्ता व दै.महाराष्ट्र टाईम्स, १३ डिसेंबर २०१५
४) जाधव मा. ना. (संपादक) सातारा जिल्हा होमगार्ड, रौप्य महोत्सव स्मरणिका, ५ डिसेंबर १९७१, के. जोशी अँण्ड को. पुणे.पान नं.२
५) उपरोक्त, पान नं.३. व सातारा जिल्हा होमगार्ड ऑफिस रेकॉर्ड.
६) माधवराव जाधव यांच्या कुटुंबियांची मुलाखत.
७) जाधव मा. ना. (संपादक), उपरोक्त, पान नं.३ - ४, व माधवराव जाधव यांच्या कुटुंबियांची मुलाखत.
८) कित्ता.